# महाराष्ट्र विधानपरिषद
## तिसरे अधिवेशन, २०२४
-------------------------------------------
## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०९ जुलै, २०२४ / आषाढ १८, १९४६ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) सहकार मंत्री**<br>**(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री**<br>**(३) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री**<br>**(४) आदिवासी विकास मंत्री**<br>**(५) कृषी मंत्री**<br>**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री**<br>**(७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

-------------------------------------------
**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**
-------------------------------------------

### शासनाच्या पशुसंवर्धन विभागाची पुनर्रचना करण्याबाबतच्या निर्णयास विरोध होत असल्याबाबत

**(१) * २३३६६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १३ मार्च, २०२४ रोजी प्रसिद्धीपत्रक काढून पशुसंवर्धन, दुग्धविकास विभागाची पुनर्रचना करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांना पशुसेवा देणाऱ्या जवळपास एक लाख वीस हजार लघु पशुवैद्यकीय व्यावसायिकांच्या रोजगारावर विपरित परिणाम होणार असल्याने सदर व्यावसायिकांनी विभागाच्या पुनर्रचनेस विरोध केला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात नोकरकपात, कंत्राटीकरण तसेच भारतीय पशुवैद्यक कायदा १९८४ च्या कलम ३० ब आणि ५७ मधील तरतुदींचा भंग होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) पशुसंवर्धन, दुग्ध विकास विभागाची पुनर्रचना करण्याच्या घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे नवापाडा (ता.नवापूर, जि.नंदुरबार) येथील आदिवासी व्यक्तीची जमीन बिगर आदिवासी व्यक्तीच्या नावे केल्याबाबत

**(२) * २३१८५ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नवापाडा (ता.नवापूर, जि.नंदुरबार) येथील गट नं. १०६/१ ही जमीन अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तीच्या नावे असून, सदर जमीन नागन मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्र व बुडीत क्षेत्रात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जमिनीतून नागन प्रकल्पाची मोठी पाटचारी जात असल्याचे लाभक्षेत्राच्या नकाशात नमूद करण्यात आलेले असून, मौजे विसरवाडी, (ता.नवापूर, जि.नंदुरबार) येथील एकाच कुटुंबातील व्यक्तींनी महसूल विभागाच्या स्थानिक व मंत्रालयीन अधिकाऱ्यांशी संगनमत करुन स्थानिक अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तींच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन त्यांच्या जमिनी स्वतःच्या नावे करुन घेतल्याचे माहितीच्या अधिकारातून माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६ व ३६-अ नुसार आदिवासींच्या जमिनी जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय व शासनाच्या मान्यतेशिवाय बिगर आदिवासी व्यक्तींना खरेदी करता येत नसताना तसेच सदर जमीन ही प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात येत असल्यामुळे सदर ठिकाणी अकृषिक परवानगी देणे अनुज्ञेय नसताना देखील अप्पर जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी अकृषिक परवानगी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित दोषी व्यक्ती, महसूल विभागातील अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) अशी बाब नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी निविष्ठा अनुदान मिळणेबाबत

**(३) * २३७९३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडल्याने करमाळा-बार्शी-माढा-सांगोला व माळशिरस या ५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना शेती पिकांच्या नुकसानीसाठी निविष्ठा अनुदान जाहीर करण्यात आले असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील उर्वरित ६ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करुनही त्या तालुक्यांतील शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे जून ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत पर्जन्याची तूट, उपलब्ध भूजलाची कमतरता, वनस्पती निर्देशांक, मृदा आद्रता व पेरणी खालील क्षेत्र व पिकांची स्थिती या घटकांचा विचार करून उर्वरीत ६ तालुक्यांमध्ये शेती पिकांसाठी निविष्ठा अनुदान देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शासन निर्णय दिनांक १६/०२/२०२४ अन्वये राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या ४० तालुक्यांव्यतिरिक्त इतर तालुक्यांमधील ज्या महसूली मंडळामध्ये जून ते सप्टेंबर, २०२३ या कालावधीत सरासरी पर्जन्यमानाच्या ७५ टक्के पेक्षा कमी व एकूण पर्जन्यमान ७५० मि.मी पेक्षा कमी झाले आहे, अशा महसूली मंडळापैकी ज्या मंडळाचे विभाजन होऊन नवीन महसूली मंडळ स्थापन करण्यात आलेली आहेत आणि त्या महसूली मंडळात अद्याप पर्जन्यमापक यंत्र (AWS) बसविण्यात आलेली नाहीत, अशी सोलापूर जिल्ह्यातील १० मंडळे देखील दुष्काळ सदृश्य मंडळे म्हणून घोषित केलेली असून ८ सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्सोवा (मुंबई) येथे आधुनिक सोयी-सुविधांयुक्त फिशिंग हार्बर मासेमारी बंदर उभारण्याचे प्रस्तावित असलेबाबत

**(४) * २३५६१ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये आधुनिक सोयी सुविधांनी युक्त असे मासेमारी बंदर (फिशिंग हार्बर) वर्सोवा येथे सुमारे १९ हेक्टर क्षेत्रावर उभारण्याचे प्रस्तावित असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत मुंबई ससून डॉक, भाऊचा धक्का ही मासेमारी बंदरे जुनी झाली असून सुविधांचाही अभाव असल्याने वर्सोवा येथे नवीन मासेमारी बंदराचा प्रस्ताव महाराष्ट्र सागरी मंडळाने (महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड) प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंदरासाठी ४९८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून या आधुनिक बंदरात अत्याधुनिक लिलाव गृह, बोट रिपेरिंग यार्ड, आइस प्लांट, बोटीसाठी रेडिओ कम्युनिकेशन टॉवर, मासे साठवणुकीसाठी जागा, बोटींना पार्किंगची सुविधा, पावसाळ्यात वादळापासून बोटींचे रक्षण होण्यासाठी ब्रेक वॉटर आदी सुविधा देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावित बंदराची उभारणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळाने (महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड) वर्सोवा येथे नवीन मासेमारी बंदराचा प्रशासकीय मान्यतेसाठीचा प्रस्ताव शासनास पाठविला होता. तथापि, केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्ताव सादर करण्यात आला नव्हता. त्यामुळे वर्सोवा येथील मत्स्यबंदर उभारणीसंदर्भात केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत महाराष्ट्र सागरी मंडळ यांना दिनांक ०५/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अब्दीमंडी (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) गावाजवळील निर्वासित मालमत्तांची बेकायदेशीररित्या विक्री केल्याबाबत

**(५) * २३८८८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील अब्दीमंडी गावाजवळील गट क्रमांक ११, १२, २६, ३७ व ४२ मधील निर्वासित मालमत्तांवर शत्रु संपत्ती म्हणून लावण्यात आलेला फलक काढण्याकरीता जिल्हा प्रशासनाने कोकण आयुक्तांची परवानगी घेणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष केल्याची बाब माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त जमिनीच्या सातबाऱ्यावर निर्वासित मालमत्ता अशी नोंद असताना स्थानिक जिल्हाधिकारी यांनी खाजगी व्यक्तीच्या नावे नोंद घेण्याबाबत आदेश पारित करुन जमिनीची खरेदी-विक्री संदर्भात नियमांचे उल्लंघन करुन खरेदी विक्री करण्यास परवानगी दिली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू आदेशाविरुध्द स्थानिक नागरिकांनी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे अपील दाखल करुनही सुनावणी घेतली नसल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन निर्वासित मालमत्ता विक्री करण्यास परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) मौजे अब्दीमंडी येथील गट क्रमांक ११, १२, २६, ३७ व ४२ मधील शेतजमीन ही निर्वासित मालमत्ता असल्याबाबतची अधिसूचनेची प्रत संचित मालमत्ता नुकसान भरपाई तथा निर्वासित मालमत्तेचे अभिरक्षक जमाबंदी आयुक्त, यांच्याकडे उपलब्ध नसून सदर जमीन ही शत्रू संपत्ती म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कोणतेही फलक लावण्यात आला नसल्यामुळे सदरचे फलक काढण्याकरीता जिल्हा प्रशासनाने कोकण आयुक्तांची परवानगी घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
(२) सदर जमिनीबाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे दाखल रिट याचिका क्र. ७९६८ /२०२१, व ८८७७/२०२२ मध्ये मा.उच्च न्यायालयाने अनुक्रमे दिनांक ०८/१२/२०२१ व २८/०९/२०२२ रोजी दिलेल्या निर्णयाचे पालन करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल क्र.७७४/२०१६ प्रकरणी तत्का.जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १७/१०/२०२३ रोजी आदेश पारित केले आहेत. सदर जमिनीच्या संदर्भात यापूर्वी झालेले खरेदी विक्रीचे व्यवहार रद्द करण्यासंबंधीचे २ दिवाणी दावे दिवाणी न्यायालय, औरंगाबाद येथे प्रलंबित आहेत. तसेच सदर दिवाणी दाव्यामध्ये सदरील खरेदी विक्री व्यवहाराच्या वैधता बाबतचा मुद्दा दिवाणी न्यायालय, औरंगाबाद तसेच मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या जनहित याचिका क्र.२३/२०२४ या प्रकरणात न्यायप्रविष्ट आहे.
(३) जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी सदर जमिनीबाबत दाखल ७७४/२०१६ प्रकरणात दिनांक १७/१०/२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयाविरुध्द दाखल अपील प्रकरणात विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २८/११/२०२३ व दिनांक १९/०१/२०२४ रोजी सर्व संबंधित अपिलार्थी व इतर सर्व संबंधितांची सुनावणी घेवून सदरचे अपील प्रकरण विभागीय आयुक्त कार्यालयात चालविण्यास योग्य नसल्यामुळे सदर अपील दिनांक १९/०१/२०२४ च्या आदेशान्वये निकाली काढले आहे.
(४) व (५) दिनांक १२/०३/२०२४ च्या शासन आदेशान्वये अपर तहसिलदार, छत्रपती संभाजीनगर व तसेच जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांचे दिनांक १२/०३/२०२४ च्या आदेशान्वये संबंधित मंडळ अधिकारी व तलाठी यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात येवून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळेच्या दूध पुरवठा करारात बदल केल्याबाबत

**(६) * २३४८७ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ५५२ शासकीय आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या एकूण १ लाख ८७ हजार गरीब, वंचित व आदिवासी मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी त्यांना दररोज २०० मि.ली. दूध पुरविण्यासाठी सन २०१९ मध्ये केलेल्या पहिल्या करारात आमुलाग्र बदल करण्यात येऊन कंत्राटदारांना ८४ कोटी रुपये खर्च येत असताना देखील १६४ कोटी रुपये देऊन शासनाकडून कंत्राटदारास ८० कोटी रुपये अतिरिक्त देण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी चितळे, महानंद यांचा रुपये ४६.४९ /-, अमुलचा रुपये ४९.७५/- दराने दूध पुरवठा होत असताना सन २०२३-२४ मध्ये या कंपन्यांच्या करारामध्ये बदल करून एका खाजगी कंपनीकडून १४६ रुपये प्रती लिटर या महागड्या दराने दूध खरेदी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निविदा काही ठराविक दुध उत्पादक संस्थांना मिळण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांकडून निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्यात आल्याने संपूर्ण निविदा प्रक्रियेची विशेष तपास पथकामार्फत (S.I.T.) चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी मुख्य सचिव यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्याबाबत व महागड्या दराने दूध खरेदी न करता पूर्वी सुरू असलेल्या चितळे, महानंद व अमुलच्या दरानेच दूध खरेदी करून विद्यार्थ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली तसेच कंत्राटदारास देण्यात आलेले अतिरिक्त ८० कोटी रुपये वसूल करुन शासनाच्या निधीचा दुरुपयोग करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दररोज २५० मि.ली. दुध देण्याबाबत दिनांक १५/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये तरतूद आहे. त्यानुषंगाने सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात ई-निविदा प्रक्रिया राबवून रुपये १५८,६७,९९,११३/- इतक्या रकमेचे एकूण ४ पुरवठाधारक संस्था यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.

शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पुरवठा करण्यात येणारे दुध हे २०० मि.ली. सुगंधी दुध असून ते टेट्रापॅक मध्ये पुरविण्यात येते. त्याकरीता प्रती २०० मि.ली. टेट्रापॅकेट दर रुपये २६.२५ इतका निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित केलेला आहे. त्यानुसार टेट्रापॅक दुधाची प्रती लिटर किंमत रुपये १३१.२५ इतकी आहे. त्यांमध्ये सर्व कर व अति दुर्गम भागातील आश्रमशाळा स्तरावर पोहोच (वाहतुकीसह) प्रती लिटर दर आहेत. तर नामांकित संस्थांचे २०० मि.ली. सुगंधी दुधाच्या टेट्रापॅकची किंमत सरासरी रुपये ३२.०० म्हणजेच प्रतिलिटर दर रुपये १६०.०० इतका आहे.
(३) हे खरे नाही.

शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना २०० मि.ली. सुगंधी दुध पुरवठा करणेसाठी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ मधील विहित केलेल्या तरतुदीचा अवलंब करुन राबविण्यात आली आहे. त्यामध्ये एकूण ६ निविदाकारांनी सहभाग घेतला होता.त्यामुळे सदर निविदा पुरेसा प्रतिसाद देखील मिळालेला आहे. तसेच सदर निविदेत प्रि- बीड बैठक देखील देण्यात आली होती. प्रि बीड बैठकीत उपस्थित निविदाकार यांनी उपस्थित केलेले मुंद्याचा विचार करुन त्यानुसार पुढील कार्यवाही केलेली आहे.

(४) महानंद डेअरी यांनी सदर निविदेत सहभाग घेतला होता, मात्र महानंद डेअरी यांचे प्रती २०० मि.ली. सुगंधी दुध टेट्रापॅकचे दर रुपये ३३.३८इतके होते.

इतर निविदाकारांचे वाटाघाटी अंती रुपये २६.२५ प्रती २०० मि.ली. सुगंधी दुध टेट्रापॅके इतके दर आहेत. त्यामुळे महानंद डेअरी यांचे प्रती २०० मि.ली. पॅकेट मध्ये ७.१३ इतके दर जास्त होते. तसेच निविदेत विभागनिहाय ४ न्युनतम दरधारक निविदाकार होते. त्यामुळे सर्वात जास्त दर महानंद डेअरी यांचे असल्याने ते न्युनतम दरधारक ठरु शकले नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील चाराटंचाई दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(७) * २३३४७ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर विभागातील सहा जिल्ह्यांमध्ये तर अमरावती विभागातील अकोला, वाशिम व बुलढाणा तसेच खानदेशातील नांदगाव, चांदवड व येवला (जि.नाशिक) या तालुक्यांसह खानदेशात जनावरांच्या चाराटंचाईची समस्या निर्माण होऊन एकीकडे चाऱ्याचे दर आवाक्याबाहेर गेले असल्याने तसेच चाराटंचाईमुळे पशूपालक चिंताग्रस्त झाल्यामुळे राज्यातील ९० लाख पशुधन कसे सांभाळावयाचे असा प्रश्न त्यांचेसमोर निर्माण झाला असून चाराटंचाई अधिक गंभीर होण्याचे संकेत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जत (जि.सांगली) तालुक्यात दुष्काळ स्थिती निर्माण होऊन शेळ्या-मेंढ्या वाचविण्यासाठी त्यांच्या चारा-पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी तसेच पशुपालकांनी शासनाकडे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत सहा महिन्यात शेळ्या-मेंढ्या वाचविण्यासाठी पशुपालक अक्कलकोट, उदगीर व कर्नाटकातील गुलबर्गा, थांबा मसळी, नीरावरी या भागात कुटुंबासह स्थलांतरित झाले असून ५० टक्क्याहून अधिक मेंढपाळांनी चार-पाच महिन्यांसाठी स्थलांतर केल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील चाराटंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) दरवर्षी सांगली, सातारा व कोल्हापूर आणि कर्नाटक राज्यातील पारंपारिक पद्धतीने पशुपालन करणारे मेंढपाळ अन्य भागात मेंढ्या चरण्यासाठी स्थलांतर करीत असतात.

(४) पशुसंवर्धन विभागामार्फत सन २०२३-२४ या वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रुपये ३९.८८ कोटी निधीमधून एकूण १७३.१० मे. टन चारा बियाण्यांचे वितरण करण्यात आले असून, यामधून २७.७१ लक्ष मे. टन हिरवा चाऱ्याचे उत्पादन झाले आहे. राज्यातील टंचाईसदृष्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दिनांक

०१/०३/२०२४ रोजी उपलब्ध चाऱ्याचा आढावा घेण्यात आला. आढाव्यादरम्यान राज्यात ५१२.५८ लक्ष मे. टन हिरवा चारा आणि १४४.४५ लक्ष मे. टन वाळलेला चारा उपलब्ध असल्याचे व राज्यातील पशुधन संख्या व प्रतिदिन चाऱ्याची आवश्यकता विचारात घेता, उपलब्ध हिरवा व वाळलेला चारा साधारणपणे जून, २०२४ पर्यंत पुरेल.

चारा उपलब्धतेबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील ८८ गावांना भूस्खलनाचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(८) * २३४०५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने केलेल्या सर्वेक्षणानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील ८८ गावांना भूस्खलनाचा धोका असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीच्या अनुषंगाने माहिती घेऊन येथील गावातील नागरिकांची जीवितहानी टाळण्यासाठी तसेच गावातील ग्रामस्थांचे स्थलांतरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांनी अहवाल सादर केलेला आहे. त्यानुषंगाने नमूद करण्यात येते की :-

१. क्षेत्र कर्मचारी यांचेमार्फत या सर्व ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देण्यात येवून भुस्खलनाचे स्वरूप, लोकवस्ती पासूनचे अंतर, अक्षांश व रेखांश, बाधित ठिकाणाचा प्रकार जसे की, डोंगर, शेतजमीन, रस्ता, इ. सर्व माहिती संकलीत करण्यात आली.
२. यामध्ये या ८८ ठिकाणांपैकी १३ ठिकाणे मानवी वस्ती पासून जवळ असलेचे निदर्शनास आले.
३. पावसाळ्यापूर्वी या सर्व ठिकाणी भूस्खलनाबाबत जाणीव जागृती करण्यात आली. जनसामान्यांना अशा परिस्थितीत काय करावे व काय करू नये, इ. बाबत सखोल माहिती देण्यात आली.
४. तसेच भारतीय भूवैज्ञानिक सर्व्हेक्षण विभाग, पुणे यांना या सर्व गावांची सविस्तर माहीती पाठवून त्यांना या ठिकाणांचा परत सर्व्हे करून तांत्रिक अहवालाची मागणी करण्यात आली आहे.
५. मानवी वस्ती असणाऱ्या ठिकाणी कुटुंबसंख्ये निहाय स्थलांतराची ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा प्राप्त होताच अश्या सर्व कुटुंबांना सुरक्षित निवारा केंद्रामध्ये स्थलांतरीत करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

६. तसेच मानवी वस्ती जवळ असणाऱ्या १३ भूस्खलन ठिकाणांचा पहिल्या टप्प्यात भुस्खलन सौम्यीकरण कामांचा रुपये ८३.१५ कोटीचा प्रस्ताव कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने शासनास सादर केला असून प्रस्तावावर आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काटेपूर्णा बॅरेज (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) अंतर्गत मौजे जांभा बु. गावचे पुनर्वसन करण्याबाबत

**(९) * २२९०४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटेपूर्णा बॅरेज (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) मधील जांभा बु. गावचा प्रकल्प बुडीत क्षेत्रात येत असल्यामुळे २००९ साली गावाचे १००% पुनर्वसनाचे काम पूर्ण होणे अपेक्षित असताना अद्याप १० टक्केही पुनर्वसनाचे काम झाले नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग यांनी जांभा ब्रु.गावाचे १०० टक्के पुनर्वसनाचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले असूनही निधीअभावी विकास कामे प्रलंबित राहिल्याने नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून गावकऱ्यांनी आंदोलने, निवेदने याद्वारे शासनाकडे पाठपुरावा करुनही अद्याप पुनर्वसनाचे काम पूर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुनर्वसनाचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

काटेपूर्णा बॅरेज प्रकल्पाअंतर्गत मौजे जांभा बु., ता.मुर्तिजापुर हे गावठाण, मेरी या संस्थेचा मंजूर पश्चजल अभ्यास अहवाल, प्रचलीत शासन निर्णय व परीपत्रके नुसार अंशतः बाधित होत आहे.

सदर अंशत: बाधित गावठाणातील बाधित कुटुंबाचे पुनर्वसन मौजे जांभा बु. या पुनर्वसित गावठाणामध्ये केले असून त्यामधील नागरी सुविधांची कामे १००% पूर्ण झालेली आहेत.

अंशत: बाधित होणाऱ्या मालमत्तांव्यतिरिक्त उर्वरित गावठाणात शासन परिपत्रक क्र. आरपीए २००५/ प्र.क्र.८७/र-१, दि २६/०५/२००५ मध्ये अंतर्भुत अटी व शर्तीचे अधीन राहून विकास कामे करण्यास हरकत नसल्याबाबत गट ग्रामपंचायत मौजे जांभा बु. यांना कार्यकारी अभियंता, मन प्रकल्प विभाग, खामगांव यांनी दिनांक ०७/१०/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगाव यांनी दि ०७/१०/२०२२ च्या पत्रान्वये पुनर्वसित नवीन गावठाणाचे हस्तांतरण मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, अकोला यांच्याकडे केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा (नवीन) येथील मुलींच्या शासकीय वसतिगृहात अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) * २२८९६ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा (नविन) येथील मुलींच्या शासकीय वसतिगृहात विद्यार्थिनींना अळ्या असलेले निकृष्ट दर्जाचे अन्न पुरविण्यात आल्यामुळे ३० मुलींना विषबाधा झाल्याची घटना माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट अन्न व वसतिगृहातील वेगवेगळ्या असुविधांच्या निषेधार्थ विद्यार्थिनींनी उमरेमाळ येथील तहसिलदार तसेच प्रांत अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतिगृहात प्रभारी स्त्री अधिक्षिका यांच्याकडून होणाऱ्या त्रासाबाबत तसेच विविध सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबतची तक्रार विद्यार्थिनींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसतिगृहात अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दिनांक २१/०३/२०२४ रोजी आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह सुरगाणा (नविन) येथील विद्यार्थिनींनी गृहपाल श्रीमती मीना राऊत या मुख्यालयी थांबत नसल्याने मुलींच्या सोयी-सुविधा व दैनंदिन व्यवस्थापन इत्यादी बाबींकडे श्रीमती राऊत यांचे दुर्लक्ष होत असल्याने पायी मोर्चा काढला होता.सदर मोर्चा उमरेमाळ पर्यंत पोहचला असताना विद्यार्थीनींना थांबवून त्यांच्याशी तालुक्याचे तहसिलदार व आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी चर्चा केली.

(४) श्रीमती मीना राऊत यांना दिनांक १३/०५/२०२४ च्या आदेशान्वये एकतर्फी कार्यमुक्त केलेले असून मुलींच्या वसतिगृहाचा कार्यभार श्रीमती गिरीजा राऊत यांच्याकडे देण्यात आलेला आहे. तसेच भोजन ठेकेदारास दिनांक २२/०३/२०२४ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून रुपये १२,५००/- इतक्या रकमेचा दंड केलेला आहे. तद्नंतर दिनांक ०५/०४/२०२४ रोजी वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक यांनी वसतिगृहास भेट दिली असता जेवणाचा दर्जा सुधारला असल्याचे तसेच वसतिगृहास नियमित पाणीपुरवठा होत असल्याचे त्यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील मच्छीमारांना थकीत डिझेल परतावा मिळणेबाबत

**(११) * २३२५९ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९६८२ ला दिनांक २१ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील किनारपट्टी भागातील ११२ गावांमध्ये मासेमारीचा व्यवसाय करण्यात येत असून ४९००३ लोकांच्या माध्यमातून ३०,००० कुटुंबे या व्यवसायावर अवलंबून असून जिल्ह्याच्या सहाय्यक मत्स्यव्यवसाय कार्यालयाकडून शासनाकडे वारंवार मागणी करूनही निधी मिळत नसल्यामुळे मच्छीमार संस्थाचा ३२ कोटी ७७ लाख १० हजार ६६७ रुपयांचा डिझेल परतावा शासनाकडे थकीत असल्याने मच्छीमार आर्थिक संकटात सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडे परताव्यासाठी मागण्यात येणारा निधी आणि जिल्ह्याला प्रत्यक्ष प्राप्त होणारा निधी यात कमालीची तफावत असल्यामुळे परताव्याच्या निधी वितरणात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील मच्छीमारांना सन २०१७-१८ मध्ये रुपये ५३, ३३८, सन २०१८ -१९ मध्ये रुपये ५८,८४७, सन २०१९-२० मध्ये रुपये ४१,७९७, सन २०२०- २१ मध्ये रुपये ३८,०१९, सन २०२१-२२ मध्ये रुपये ४०,६०१ आणि सन २०२२-२३ मध्ये रुपये ४०,००० असे डिझेल अनुदान दिले जात असून हे अनुदान बंद करून त्या बदल्यात डिझेल परतावा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून सदर डिझेल परतावाही थकीत असल्यामुळे मच्छीमारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रायगड जिल्ह्यातील मच्छीमारांना थकीत डिझेल परतावा लवकरात लवकर देण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण रुपये २६८.७० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून, त्याचे खालीलप्रमाणे जिल्हा निहाय वाटप करण्यात आले. यापैकी रायगड जिल्ह्यास रुपये ६०.०८ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

| अ.क्र. | जिल्हा | वाटप निधी (आकडे कोटीत) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | पालघर | ९.९४ |
| २ | ठाणे | ९.५० |
| ३ | मुंबई-उपनगर | ५०.८६ |
| ४ | मुंबई शहर | ६९.६२ |
| ५ | रायगड | ६०.०८ |
| ६ | रत्नागिरी | ६०.९९ |
| ७ | सिंधुदुर्ग | ७.७१ |
| | एकूण | २६८.७० |

(३) हे खरे नाही.
(४) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता डिझेल परतावा अदा करण्याकरीता रुपये १५०.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरातील नागरिकांची विविध आर्थिक प्रलोभनातून फसवणूक झाल्याबाबत

**(१२) * २३११४ श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर येथे गुंतवणुकीवर अधिक व्याज दर, दामदुप्पट परतावा, शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकी इ. सारख्या आर्थिक प्रलोभनातून शहरात रुपये ६६९ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात सहकार खात्यातील उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी सहभागी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन नागरिकांना त्यांची रक्कम परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ४ सहकारी पतसंस्था व २ नागरी सहकारी बँक अशा एकूण ६ संस्थेतील ठेवीदारांच्या रुपये ४२९.४३ कोटी इतक्या रकमेची अफरातफर झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकूण ०४ नागरी सहकारी पतसंस्था व ०२ नागरी सहकारी बँका अशा एकूण ०६ नागरी सहकारी पतसंस्था/ बँकाबाबत तक्रार अर्ज प्राप्त झाले होते. त्यानुसार केलेल्या चौकशीच्या अहवालानुसार संबंधित पतसंस्था/ बँकाचे संचालक मंडळ, मुख्य व्यवस्थापक तसेच अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तिय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ (MPID) व भारतीय दंड संहिता (IPC) कायद्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांनी १५९ व्यक्तींवर गुन्हे दाखल केले असून त्यापैकी २९ व्यक्तींना अटक झालेली आहे.

तसेच पोलीस विभागाकडून आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या., या पतसंस्थेच्या मालकीच्या रुपये १९.१८ कोटी रकमेच्या १९ मालमत्ता आणि आरोपींच्या रुपये ५६.३८ कोटी इतक्या रकमेच्या ४६ मालमत्ता जप्त केल्या आहेत. उर्वरीत पतसंस्था व बँकेच्या मालमत्ता जप्तीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मस्त्य व्यावसायिकांना अद्ययावत यंत्रसामुग्री व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१३) * २३१२२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवामानातील सातत्याने होणारे बदल, समुद्रातील वाढता मानवी हस्तक्षेप आणि वाढत्या जलप्रदूषणामुळे दिवसेंदिवस माशांचा साठा कमी होत असून, राज्याच्या सागरी जलाधीक्षेत्रात मुबलक मिळणारी मस्त्यसंपदा आणि तिच्यावर उपजीविका करणाऱ्या लाखो मच्छीमारांना मासळीच्या दुष्काळाशी सामना करावा लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने परराज्यातील यांत्रिक तसेच यंत्रचलित मासेमारी नौकांवर प्रतिबंध व अवैध पर्सेसिंग, एलईडी मासेमारीवर बंदी न घातल्याने व राज्याच्या सागरी हद्दीत परराज्यातील मच्छीमार मोठ्या प्रमाणात मासेमारी करित असल्यामुळे तसेच अद्ययावत यंत्रसामुग्री, हायस्पीड बोटींच्या अभावामुळे राज्यातील पारंपारिक मच्छीमारांचे जगणे असहय झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील मत्स्यव्यवसायिकांना मत्स्यव्यवसाय वाढविण्यासाठी अद्ययावत यंत्रसामुग्री तसेच सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

वातावरणामध्ये नैसर्गिकरित्या होणारे बदल जसे की, चक्रीवादळ, वाढते तापमान, अवकाळी पाऊस, वाढते प्रदूषण यामुळे समुद्रातील मत्स्यसाठ्यावर काही अंशी परिणाम होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि, राज्याचे मागील ३ वर्षांचे मत्स्योत्पादनाची आकडेवारी पहाता मत्स्योत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात सागरी कायद्यातील तरतुदीचे उलंघन करुन परराज्यातील मासेमारी नौका घुसखोरी करुन मासेमारी करण्यास प्रतिबंध करण्याच्या अनुषगांने विभागास उपलब्ध झालेल्या ७ अतिवेगवान गस्ती नौकाव्दारे सागरी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या नौकावर कारवाई करण्यात येत आहे.

रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी जलधी क्षेत्रात परराज्यातील मासेमारी नौका घुसखोरी करुन मासेमारी करीत असल्याचे यापूर्वी निदर्शनास आलेले आहे. रत्नागिरी जिल्ह्यात घुसखोरी केलेल्या एकूण ३० परप्रांतीय नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१, सुधारणा अधिनियम २०२१ कायद्याअंतर्गत कारवाई केलेली असून रुपये १६,१०,०००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात घुसखोरी केलेल्या एकूण ०८ परप्रांतीय नौकांवर कारवाई केलेली असून रुपये ९,७५,००५/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(३) केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने मत्स्यउद्योग व व्यवसाय वाढविण्यासाठी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शित साखळी व्यवस्थापनासाठी Ice Plant, Cold Storage, शितवाहन पुरवठा करण्यासाठी योजना, खोल समुद्रात मासेमारीकरीता नौका बांधणी up gradation of fishing vessels व इतर योजना राबविण्यात येत आहेत. तसेच मच्छिमार बांधवास दिनांक ०९/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसहाय देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वन्य प्राण्यांचे नागरिक व पाळीव प्राण्यांवरील हल्ले तसेच पिकांची नासाडी रोखण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणेबाबत

**(१४) * २३४६९ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिक व पाळीव प्राण्यांचा मृत्यू होत असून झाल्याचे व कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यामध्ये वन्य प्राण्यांचा उपद्रव वाढला असून, पिकांच्या नासाडीसह शेतकऱ्यांवर हल्ल्यांच्या घटनातही वाढ झाल्याचे व शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील टाकळीहाजी, कवठे यमाई परिसरात बिबट्यांचा वावर असून टाकळी हाजी येथील तामकवाडीत बिबट्याने केलेल्या हल्ल्यात तीन शेळया व दोन करडांचा मृत्यू झाल्याचे तसेच आगरमळा तितरमळा परिसरात पाच महिन्यांपूर्वी चार वर्षाच्या बालकाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील मसाडे, रामवाडी, शिवनी (खु) चाफनाथ, उमरा, मसोड, शेनोडी शिवारात मोठ्या प्रमाणावर वन्यप्राणी असून प्रामुख्याने रोही, रानडुक्कर यांचा मुक्तसंचार वाढला असून हे वन्यजीव प्रामुख्याने पिकांची मोठ्या प्रमाणावर नासाडी व शेतीमध्ये काम करणारे व शेतराखण करणाऱ्या व्यक्तींवर हल्ला करीत असल्याने शेतकऱ्यांनी रोही, रानडुक्कर यांच्यापासून रक्षणाकरीता त्यांना मारण्यासाठी परवानगी मिळण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात माहे जानेवारी, २०१८ ते दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ या सहा वर्ष दोन महिन्यांच्या कालावधीत वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात ४२१ व्यक्तींचा बळी गेला असून ३ हजार २२५ जण जखमी झाल्याने सदर प्रकरणी शासनाने वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिक व पाळीव प्राण्यांच्या झालेल्या मृत्यूप्रकरणी मदत तथा पिकांची होणारी नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच राज्यातील वन्य प्राण्यांचे हल्ले रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) सन २०२३-२४ मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांमध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ३८ व्यक्तींचा मृत्यू, ३७२६ पशुधन हानी व ३४११३ शेतपिकांचे नुकसान झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

दिनांक ०५/०४/२०२४ रोजी वन्यप्राण्याने श्री.गौरव बबन गावडे, रा. तामखरवाडी, ता.शिरुर, जि.पुणे यांच्या मालकीच्या ३ शेळ्या, २ करडू ठार केल्याचे निदर्शनास आले असून प्रचलित तरतूदीनुसार संबंधितास रुपये ४१,२५०/- इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

मौजे आळे (बाभळवन, आगरमळा), ता.जुन्नर, जि.पुणे येथे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये बिबट्याच्या हल्ल्यात कु. शिवांश अमोल भुजबळ, वय २ वर्ष याचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले असून प्रचलित तरतूदीनुसार त्यांचे कायदेशीर वारसास रुपये २५.०० लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) कळमनुरी तालुक्यातील मसाडे, रामवाडी शिवनी (खु), चाफनाथ, उमरा, शेनोडी शिवारात वन्यप्राण्यांचा वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर गावात शेतीमध्ये काम करणारे व शेतराखण करण्याऱ्या व्यक्तींवर वन्यप्राण्यांनी हल्ला केल्याची घटना निदर्शनास आलेली नाही. विभागीय वन अधिकारी (प्रा.), हिंगोली यांच्याकडे रोही व रानडुक्कर या वन्यप्राण्यांना पारध करण्याचे अर्ज केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात राज्यात सन २०१८-१९ ते सन २०२३-२४ या कालावधीत ४२६ व्यक्ती मृत व ३,२२५ व्यक्ती जखमी झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे नुकसान झाल्यास प्रचलित तरतूदीनुसार संबंधितास अर्थसहाय्य अदा करण्यात येते. त्याकरीता वन्यप्राण्यांनी केलेल्या नुकसानीची भरपाई अदा करण्याकरीता उणे(-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- क्षेत्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- मानवी जीवितास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकीय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.
- आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.

- वनालगतच्या गावांतील गावकऱ्यांची वनावरील निर्भरता कमी व्हावे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत असून त्यात एल.पी.जी. गॅस पुरवठा, बायोगॅस, निंधुर चुली, सोलर दिवे इत्यादी उपक्रम राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर येथे श्री अन्न उत्कृष्टता केंद्र उभारण्याबाबत

**(१५) * २३५१६ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथे शासनाने श्री अन्न उत्कृष्टता केंद्र उभारण्याचा निर्णय घेऊन एक वर्षाचा कालावधी पूर्ण होऊनही अद्याप या केंद्राचे काम सुरू झाले नसल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रब्बी पीक हंगामासाठी ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्ह्यात ज्वारीसह इतर तृणधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असतानाही या केंद्राची उभारणी का करण्यात आली नाही, तसेच शेतकरी भरडधान्याच्या विविध योजनांपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष म्हणून जाहीर केले असतानाही, सदर वर्ष उलटून गेले तरीही श्री अन्न उत्कृष्टता केंद्र अद्याप उभारली नसल्याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच श्री अन्न उत्कृष्टता केंद्र सोलापूर ऐवजी बारामतीला सुरु करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाचे चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर येथे श्री अन्न उत्कृष्टता केंद्र उभारण्याकरीता अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.धनंजय मुंडे :** (१), (२), (३), (४) व (५) सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पिय भाषणामध्ये केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने दिनांक १७/०४/२०२३ च्या शासन परिपत्रकान्वये सोलापूर येथे श्री अन्न उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. स्मार्ट प्रकल्पामार्फत सोलापूर येथे राष्ट्रीय तृणधान्य संशोधन संस्था (IIMR) हैद्राबाद, या संस्थेसोबत सामंजस्य करार करुन समुदाय आधारित संस्थाच्या (CBO) संचालक यांचे प्रशिक्षणातून क्षमता बांधणी करण्यासाठी सदर केंद्र प्रस्तावित आहे. त्यानुसार यासाठी जागतिक बँकेची मान्यता घेण्याची प्रक्रिया कार्यान्वित होती.

दरम्यानच्या कालावधीत ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट (ADT) बारामती यांच्याकडून हा घटक राबविण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला. ADT, बारामती संस्थेच्या प्रस्तावामध्ये कोणत्याही साधन संपतीमध्ये गुंतवणूक करावयाची नसल्याने व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठीची सर्व सिध्दता ADT बारामती या संस्थेकडे असल्याने दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ च्या शासन परिपत्रकान्वये श्री अन्न उत्कृष्टता केंद्र ADT, बारामती येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. तथापि, लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने दिनांक १३ मार्च, २०२४ च्या शासन

परिपत्रकान्वये दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ चे शासन परिपत्रक अधिक्रमित करुन दिनांक १७ एप्रिल, २०२३ च्या शासन परिपत्रकातील सूचनांनुसार कार्यवाही करण्याचे सूचित करण्यात आले. त्यानुसार सोलापूर येथे श्री अन्न उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात येत असून त्यानुषंगाने IIMR यांच्या सोलापूर येथील उपकेंद्रामध्ये Demonstration center बळकटीकरण साठी साहित्य देणे व तिथे Millet विषयाचे CBO संचालकांना प्रशिक्षण देण्याबाबत नव्याने ToR व Single Source Justification Note अंतिम करण्याची कार्यवाही स्मार्ट प्रकल्पामार्फत सुरु आहे.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील अवैधरित्या वाळू उपसा करुन शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर हल्ला करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करण्याबाबत

**(१६) * २३७२१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरातील रामानंद घाट नजिक दिनांक १८ मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफीयांना रोखण्यासाठी गेलेल्या महसूल पथकातील मंडळ अधिकारी यांना असभ्य भाषा वापरून, भरधाव वेगाने धावणाऱ्या ट्रॅक्टरखाली ओढून जीवे मारण्याचा प्रयत्न वाळू माफियांकडून करण्यात आला आहे तसेच यावल तालुक्यातील यावल-फैजपुर रस्त्यावर अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी उभ्या असलेल्या पोलीस पथकास डंपर भरधाव वेगाने नेऊन चिरडण्याचा प्रयत्न वाळू माफियांकडून दिनांक १० मार्च, २०२४ रोजी करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे व अवैध वाळू उपसा रोखण्याचे काम करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर वाळूमाफियांकडून हल्ला होण्याचे प्रमाण वाढले असल्याने पुन्हा असे प्रकार होऊ नये यादृष्टीने शासनाने कायमस्वरूपी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) जळगाव शहरातील रामानंद घाट नजिक दिनांक १८/०३/२०२४ रोजी वा त्यादरम्यान अवैध रित्या वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफीयांना रोखण्यासाठी गेलेल्या महसूल पथकातील मंडळ अधिकारी यांना वाळू माफीयांकडून जिवे मारण्याचा प्रयत्न झाला.

प्रकरणी ट्रॅक्टर चालक व इतर २ व्यक्तींवर भादवि कलम ३५३, ३७९, १८६, ५०४, ५०६ व ३४ अन्वये गु.र.नं. ८८/२०२४ दाखल केला असून ट्रॅक्टर चालक यांना अटक होवून ते जामीनावर सुटलेले आहेत.

यावल तालुक्यातील यावल फैजपूर रस्त्यावर अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी उभ्या असलेल्या पोलीस पथकास डंपरने चिरडण्याचा प्रयत्न करणाऱ्या वाळू माफीयांविरुध्द भादवि कलम ३५३, ३०७, ३७९, २७९, ३३७, ४२७, ३४ व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८ व मोटरवाहन अधिनियम, १९८८ चे कलम १८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा गु.र.क्र.५९/२०२४ असा आहे.

जळगाव जिल्ह्यात दिनांक ०१/०३/२०२४ ते ३०/०५/२०२४ या कालावधीत एकूण ८४१ प्रकरणी रुपये ६८७.३८ लाख दंडाची रक्कम वसूल करुन ९४ गुन्हे दाखल करुन ३४ वाहने जप्त केली आहेत.

पथकाच्या दौऱ्याच्या मार्गावर वाळू चोरी करणाऱ्या व्यक्तीकडून पाळत ठेवणारे, पाठलाग करणारे इसम यांच्यावर प्रतिबंधात्मक कार्यवाही/गुन्हे दाखल करण्याच्या सूचना जिल्हा वाळू संनियंत्रण समितीच्या सभेत महसूल व पोलीस अधिकाऱ्यांना देऊन भविष्यात अवैध गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या आहेत.

-----------------

## बंजारा बोलीभाषेला राज्यभाषेचा दर्जा देण्याबाबत

**(१७)** * **२३८४५ श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बंजारा बोलीभाषेला राज्यभाषेचा दर्जा देण्याबाबत वारंवार मागणी करण्यात आली असून, केंद्र शासनाच्या भाषेच्या सूचीमध्ये बंजारा भाषेचा समावेश करण्याबाबत राज्यशासनाने यापूर्वी शिफारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या सूचीमध्ये बंजारा भाषेचा समावेश करण्याकरीता राज्यशासनाने पाठपुरावा केला आहे काय तसेच याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) सांस्कृतिक कार्य विभागाकडून विविध भाषेतील संस्कृतीचे, साहित्य व कलेच्या माध्यमातून जतन व संवर्धन केले जाते.

बंजारा ही बोली भाषा असून, विभागाकडून कोणत्याही बोली भाषेला राज्यभाषेचा दर्जा देण्याची अथवा केंद्र शासनाच्या सुचीमध्ये अंतर्भूत करण्याची शिफारस या विभागामार्फत केली जात नाही. सदर मागणीच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या सुचीमध्ये समावेश राज्यभाषा म्हणून होण्याच्यादृष्टीने इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सामान्य प्रशासन विभाग, मराठी भाषा विभाग व इतर संबंधित विभागांशी विचार-विनिमय करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सागरेश्वर (जि.सांगली) अभयारण्यातील कुंपणाची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(१८)** * **२३९७२ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरेश्वर (जि.सांगली) अभयारण्यात बिबटे, गवे, हरणे, रानडुकरे, साळींदर हे प्राणी असून अरण्याच्या सभोवतालच्या काटेरी तारेच्या कुपणाची उंची कमी असल्याने त्याची सुरक्षा धोक्यात आली असून सदर प्राणी सातत्याने अरण्याच्या बाहेर जात-येत असून लगतच्या शेतीचे नुकसान करीत असल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी अनेकदा आंदोलने करुन अभयारण्याला उंच जाळीचे कुंपण घालून प्राण्यांना बंदिस्त करण्याची मागणी केली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासाठी कोटयावधी रुपयांचा निधी दिलेला असतानाही अद्याप अभयारण्याच्या कुंडल हद्दीतील काही भागात, आसद हद्दीतील कड्याच्या परिसरामध्ये तसेच तुपारी-दहयारी हद्दीतील कुंपणाचे काम अपूर्ण असून काही ठिकाणी कुंपणाला भगदाड पडले असल्याचे दिनांक २८ मे, २०२३ रोजी निदर्शनास येऊनही वन विभागामार्फत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अभयारण्यातील प्राण्याच्या सुरक्षेकरीता कुंपणासह अन्य कामे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सन २०१० ते सन २०१२ या कालावधीत सागरेश्वर अभयारण्याभोवती जवळपास ३२ कि. मी. पैकी २९ कि.मी. एवढे लांबीचे जाळीचे कुंपण उभारण्याची काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित ३ कि.मी. लांबीच्या कुंपणाचे काम नियोजित असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने खालील कामे करण्यात येत आहेत.
अभयारण्यातील ७-सिमेंट बंधारे, २-विहिरी, २-तलाव व इतर बंधारे ताकारी उपसा कालव्याच्या पाण्याने भरली जातात. तसेच १३ कृत्रिम पाणवठ्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो.

अभयारण्यातील चितळ व सांबर या तृणभक्षी वन्य प्राण्यांकरीता उन्हाळयात चारा पुरवठा करण्यात येतो.

अभयारण्य क्षेत्रातील गवताचे प्रमाण वाढविण्याकरीता उपद्रवी वनस्पतीचे उच्चाटन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील आदिवासी बहुल क्षेत्रातील शेतकऱ्यांचे वनहक्क दावे प्रलंबित असल्याबाबत

**(१९)** * **२४०७१ श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक (जि.नागपूर) तालुक्यातील आदिवासी बहुल क्षेत्रातील शेतकऱ्यांचे पस्तीस वैयक्तिक तर एक सामूहिक दावा गेल्या सहा वर्षापासून प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील शेतकरी अनेक वर्षापासून वन विभागाच्या जमिनीवर शेती करत असून, शेतकऱ्यांना सदर जमीन देण्याबाबत वन विभागातर्फे सर्वेक्षण केल्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांकडे सदर दावे अद्याप प्रलबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वन हक्काचे एकूण ३६ दावे मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) सद्य:स्थितीत, जिल्हास्तरीय वनहक्क समिती, नागपूर यांचेकडे रामटेक तालुक्यातील एकही वैयक्तिक व सामुहिक वनहक्क दावा प्रलंबित नाही.

परंतु रामटेक तालुक्यातील सन २०२३-२४ या कालावधीत वैयक्तिक वनहक्काचे एकूण १४० आणि ३ सामुहिक वनहक्क दावे उपविभाग वनहक्क समिती, रामटेक यांना प्राप्त झाले आहेत. सदर दाव्यांच्या अनुषंगाने उपस्थित त्रुटीपुर्ततेकरीता संबंधित शेतकऱ्यांना कळविलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नागपूर, भंडारा व गोंदिया वनविभागातील वाघांच्या मृत्यूत वाढ होत असल्याबाबत

**(२०) * २३२९५ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाघांच्या मृत्यूची संख्या वाढत असून माहे मार्च, २०२४ च्या अखेर ते माहे एप्रिल, २०२४ च्या सुरुवातीच्या १० दिवसांमध्ये विदर्भात तीन वाघांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची तसेच नागपूर शहरापासून काही अंतरावरील रुई गावात व गोंदिया वनविभागांतर्गत देवरी वनक्षेत्रात अनुक्रमे दिनांक २१ मार्च, २०२४ व दिनांक ३० मार्च, २०२४ रोजी मृतावस्थेत आढळलेल्या वाघांच्या पायांची नखे व पंजे गायब असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२३ मध्ये जवळपास ५२ वाघांचे मृत्यू झाले असतानाच नागपूर, भंडारा व गोंदिया वन विभागातील अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे वाघांच्या शिकारीच्या प्रमाणात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मृत वाघांचे अवशेष न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवून त्याबाबत सखोल तपास करण्यात आला आहे काय, तसेच त्यानुषंगाने संबंधित वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) सन २०२३ मध्ये नागपूर वनवृत्तातील भंडारा, गोंदिया व नागपूर वनविभागामध्ये आपसी झुंजीत-१, वाहन अपघातात-१, विहिरीत पडून-१ व विद्युत प्रवाहामुळे-२ असे एकूण ५ वाघांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. विद्युत प्रवाहामुळे मृत झालेल्या २ वाघांच्या प्रकरणांमध्ये वनगुन्हा नोंदवून प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यात आले आहे.

सन २०२४ मध्ये विदर्भातील नागपूर वनविभागातील सेमीनरी हिल्स, नागपूर वनपरिक्षेत्रतील आयसीडी अजनी अंतर्गत मौजा रुई या गावामध्ये ईडन पार्कजवळ दिनांक २०/०३/२०२४ रोजी वाघाचे शव कुजलेल्या अवस्थेत आढळून आले आहे. सदर वाघाच्या डोक्याचे हाड मोडल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे. या आधारावर प्राथमिक चौकशीत सदर वाघाच्या मृत्यूचे संभावित कारण अपघात नोंदविण्यात आले आहे. सदर वाघाच्या मागील डाव्या पायाची २ नखे आढळून आली

नाही. सदर नखे अपघाताने तुटली असावीत असे प्राथमिक तपासणीत निदर्शनास आले आहे. सदर वाघाचे अवयाचे नमूने न्यायवैद्यक प्रयोग शाळेत पाठविण्यात आले असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे. प्रस्तुत प्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

भंडारा वनविभागातील लेंडेझरी वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र लेंडेझरी-२ येथे दिनांक २७/०३/२०२४ रोजी एक नर वाघ मृत अवस्थेत आढळून आला असून त्याचे सर्व अवयव शाबुत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर वाघाचा मृत्यू हा दोन वाघांच्या आपसी झुंजीत झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.

गोंदिया वनविभागातील देवरी वनपरिक्षेत्रातील नियतक्षेत्र रोपा येथील कक्ष क्रमांक ९८ (राखीव वन) येथे दिनांक २९/०३/२०२४ रोजी वनकर्मचाऱ्यांना गस्ती दरम्यान वाघाचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला आहे. प्रस्तुत प्रकरणाची माहिती मिळताच वन अधिकारी/ कर्मचारी, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांचे प्रतिनिधी, मानद वन्यजीव रक्षक गोंदिया, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, देवरी, पशु अधिकारी देवरी व इतर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता नाल्याच्या काठावर खड्डयासारख्या ठिकाणी मृत वाघाचे केस व विखुरलेल्या अवस्थेत शरीर/ अवयव आढळून आहे. राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरणाने जारी केलेल्या SOP अवलंब करुन वाघाच्या अवयवाचे नमूने गोळा करुन न्यायवैद्यक प्रयोगशाळा, नागपूर येथे पाठविण्यात आले असून उर्वरित अवयव जाळून नष्ट करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जनजाती सल्लागार परिषदेच्या ५१ व्या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२१) * २३१९८ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी समाजाच्या उन्नतीचे निर्णय घेण्याकरीता व त्याविषयी शासनास शिफारस करणेकरीता जनजाती सल्लागार परिषदेची निर्मिती करण्यात आली असून, सदर परिषदेची मंत्रालयात दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या ५१ व्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी अद्याप झाली नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेची ५१ वी बैठक दिनांक ११ ऑक्टोबर, २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये १८ निर्णय घेण्यात आले असून त्याअनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील चांदोली धरणालगत असलेला मत्स्यबीज प्रकल्प सुरु करणाबाबत

**(२२) * २३५६० श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील चांदोली धरणाच्या पायथ्याशी सुमारे पाच कोटी रुपये खर्च करून बांधलेला मत्स्यबीज प्रकल्प मागील तीन वर्षापासून विनावापर पडून असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या चौथ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांदोली धरण, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प या प्रमुख पर्यटन स्थळासह चांदोलीचा मत्स्यबीज प्रकल्प पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरणार असूनदेखील प्रशासनाकडून झालेल्या दुर्लक्षामुळे या प्रकल्पासाठी देण्यात आलेला निधी वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निधीचा विनियोग करून चांदोली मत्स्यबीज प्रकल्प लवकरात लवकर सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

चांदोली येथे मत्स्यबीज उत्पादन केंद्राचे बांधकाम चालू असून, पहिल्या टप्प्यात संवर्धन तलावांचे काम झाले आहे. या संवर्धन तलावामध्ये प्रायोगिक तत्वावर सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये अनुक्रमे ६.५२ व १२.२८ लक्ष इतके मत्स्यबीज संगोपनाद्वारे तयार करण्यात आले आहे. या मत्स्यबीजाचा पुरवठा जिल्ह्यातील मत्स्यव्यावसायीकांना करण्यात आला आहे.

(३) या मत्स्यबीज केंद्रामधील ७ संवर्धन तलाव, १ संचयन तलाव, २ मोरी, १ शेड इत्यादीचे कामे झाले आहे. सद्य:स्थितीत पाणीपुरवठा व्यवस्था विभाग व विद्युतीकरण, पाणीसाठवण टाकीची पाईपलाईन कामे जलदगतीने कामे पूर्ण करुन घेणेची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील किल्ले धारुर येथील बालाजी मंदीर देवस्थान च्या जमिनीची बेकायदेशीररित्या विक्री केल्याबाबत

**(२३) * २३८९१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील किल्ले धारुर येथे शहराला लागून असलेल्या बालाजी मंदीर देवस्थान ला तत्कालीन निजाम सरकारने देखभालीसाठी देण्यात आलेली जमीन ही खिदमतमाश प्रकारामध्ये मोडत असून, सदरहू जमिनीची खरेदी-विक्री व हस्तांतरण करण्यास निर्बंध असतानाही देवस्थानाची सर्व्हे क्र. ३५९, ३६३ व ५५१ ही जमीन तुकडे-तुकडे करुन अवैधपणे विक्री केले असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, बीड, उप जिल्हाधिकारी (सामान्य) भुसुधार, बीड, धर्मादाय उपायुक्त, बीड, उपविभागीय अधिकारी, माजलगांव, सहदुय्यम निबंधक, धारूर, तहसिलदार, किल्ले धारूर, मुख्याधिकारी, किल्ले धारूर व इतर संबंधित अधिकारी यांचे सोबत देवस्थानाचे विश्वस्थ श्री.प्रमोदकुमार तिवारी व श्री.दुष्यंतकुमार तिवारी यांनी संगनमत करुन बनावट कागदपत्र तयार करुन जमिनीची विक्री केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने बालाजी मंदीर देवस्थानाच्या जमिनीची बेकायदेशीररित्या खरेदी-विक्री केल्याबाबत संबंधित दोषीं अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

मा.दिवाणी न्यायालय, माजलगाव येथील विशेष दिवाणी दावा क्र.३९/२०१० मधील पारित आदेश दिनांक १६/१०/२०१८ यांस अनुसरून गट क्र.३५९, ३६३ व ५५१ चे मालकी हक्कात असलेली देव बालाजी मंदिर ही नोंद कमी करून प्रमोदकुमार शरदकुमार तिवारी, दुष्यंत प्रमोदकुमार तिवारी यांचे नावाची नोंद फेरफार क्र.१११७० अन्वये नोंदविण्यात आली.

तद्नंतर हैद्राबाद भूसुधार निर्मुलन कायदा, १९५४ च्या कलम २ अ अन्वये प्राप्त अधिकारांतर्गत उपजिल्हाधिकारी, भूसुधार, बीड यांचे आदेश दिनांक ०४/११/२०२० अन्वये सर्वे क्र. ३५९, ३६३ व ५५१ ही जमीन वर्ग १ करण्यात आली. तद्नंतर तत्कालीन तहसिलदार, धारूर व मुख्याधिकारी, नगरपालिका, धारूर यांचेकडून पारित आदेशांस अनुसरून जानेवारी, २०२४ पूर्वी सर्वे क्र. ३५९ मधील काही प्लॉटची खरेदी विक्री झालेली आहे.
(२) हे खरे नाही.

बनावट कागदपत्रे बनविल्याची बाब निदर्शनास येत नाही.
(३) जिल्हाधिकारी बीड यांचे आदेश दिनांक २५/०१/२०२४ अन्वये या प्रकरणी अंतिम आदेश प्राप्त होत नाहीत तोपर्यंत मौजे धारुर, ता.धारुर यथील वादग्रस्त स.नं. ३५९, ३६३ व ५५१ मध्ये कोणत्याही जमिनीच्या प्रकाराचे हस्तांतरण, खरेदी/ विक्री व्यवहार व इतर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात येऊ नये, असे सहा. दुय्यम निबंधक, बीड व दुय्यम निबंधक श्रेणी-१ धारूर व मुख्याधिकारी, धारूर यांना कळविण्यात आले आहे. प्रस्तुत कार्यवाही विरोधात श्री.प्रमोद तिवारी व इतर यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट पिटीशन क्र.२१४९/२०२४ दाखल केले असून त्यामध्ये जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाने प्रकरणाची सर्व वस्तूस्थिती अंतर्भूत करून दिनांक २८ मार्च, २०२४ रोजी शपथपत्र दाखल केले असून सदर न्यायालयीन प्रकरणामध्ये प्राप्त होणाऱ्या अंतिम आदेशांनंतर या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

या प्रकरणामध्ये झालेल्या अनियमिततेस जबाबदार अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून खूलासे प्राप्त करून घेऊन आवश्यकतेप्रमाणे विभागीय चौकशी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) विभागातील पळससह चार गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी जेएसडब्ल्यू कंपनीने ताब्यात घेऊन त्यांना योग्य मोबदला न दिल्याबाबत

**(२४) * २३४८९ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठाणे (ता.रोहा, जि.रायगड) विभागातील पळससह चार गावांतील शेतकऱ्यांना विश्वासात न घेताच त्यांच्या शेतजमिनीमधून उच्चदाब विद्युत टॉवर लाईन नेण्यासाठी जेएसडब्ल्यू कंपनीने सुमारे ३० किलोमीटर अंतरातील जमिनीचे परस्पर सर्वेक्षण करून जमिनी ताब्यात घेतल्याचे माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेएसडब्ल्यू कंपनीच्या मनमानी कारभाराच्या विरोधात पळससह चारही गावातील ग्रामस्थांनी रोहा तहसिल कार्यालयावर मोर्चा काढून तहसिलदारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांची रीतसर परवानगी घेऊन या शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) मौजे पळस, शेतपळस, बाहेरशीव व निडी ता.रोहा, जि.रायगड या चार गावातील शेतकऱ्यांच्या शेतीमधून उच्चदाब विद्युत टॉवर लाईन टाकण्याचे जेएसडब्ल्यू कंपनीकडून प्रस्तावित आहे. सदर कामास विरोध असल्याबाबतचे निवेदन स्थानिक ग्रामस्थांनी दिनांक २२/०३/२०२४ रोजी तहसिलदार, रोहा, जि.रायगड यांना दिले आहे.

उच्च दाबाच्या विजवाहिन्या टाकण्यासाठी जमिनींचा मोबदला निश्चित करण्याकरीता शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर, २०२२ नुसार उपविभागीय अधिकारी यांच्यास्तरावर समिती नियुक्त करण्यात आली आहे. तथापि, संबंधित कंपनीने विजवाहिनीचे काम करणेबाबतचा प्रस्ताव अद्याप जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आटपाडी (जि.सांगली) येथील सूतगिरणीच्या व कवठेमहांकाळ येथील साखर कारखान्याच्या जमिनींच्या विक्रीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

**(२५) * २३३०९ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील एका राजकीय पक्षाचे जिल्हाध्यक्ष यांनी बाबासाहेब देशमुख सूतगिरणी व बाबासाहेब देशमुख इंडस्ट्रीज प्रा.लि. मार्फत चुकीच्या अकृषिक परवान्याच्या आधारे सूतगिरणीची ५१ एकर जमीन परस्पर विकल्यामुळे राज्य शासन, जिल्हा बँक व अन्य एका बँकेचे आर्थिक नुकसान झाल्याप्रकरणी तसेच सूतगिरणीत आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा मध्यवर्ती बँकेने कर्ज वाटप, कर्जमाफी, बेकायदेशीररित्या कारखाना व सूतगिरणीच्या जमिनीच्या विक्रीचे व्यवहार, सहकारी संस्थेची जागा खाजगी संस्थांना बेकायदेशीररित्या देणे इ. गैरप्रकार केल्याचे निदर्शनास आल्याने बँकेच्या चौकशीसाठी पूर्ण वेळ अधिकारी नियुक्त करुन बँकेवर प्रशासक नेमण्यात यावा, तसेच कवठेमहांकाळ येथील महांकाली साखर कारखाना आणि आटपाडीतील सूतगिरणी यांच्या जागा विक्रीबाबत झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) उपरोक्त प्रश्नात नमूद केलेले निवेदन कार्यालयीन अभिलेखाची पडताळणी केली असता असे निवेदन प्राप्त असल्याचे दिसून येत नाही. तथापि, सदर प्रकरणाची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे-

बाबासाहेब देशमुख सूतगिरणीच्या सांगली जि.म.स. बॅंकेकडील थकबाकी वसुलीसाठी सरफेसी ॲक्ट, २००२ अंतर्गत कारवाई करुन गिरणीची स्थावर मालमत्ता विक्रीच्या अनुषंगाने केलेल्या मुल्यांकनानुसार मालमत्ता विक्रीची राखीव किंमत रुपये ४०.०० कोटी निश्चित करुन त्यानुसार दैनिक लोकसत्ता व दैनिक इंडियन एक्सप्रेस मध्ये जाहीरात देण्यात आली. त्यानुसार प्राप्त ४ निविदांपैकी अधिकतम बोलीदार बाबासाहेब देशमुख इंडस्ट्रिज प्रा.लि. आटपाडी यांनी रुपये ११.५० कोटी देण्याची तयारी दर्शवली. त्यांनी बोलीची रक्कम रुपये ११.५० कोटी तसेच ज्ञात वैधानिक देणी रुपये २४.६१ कोटी व शासकीय भागभांडवल रुपये २४.१९ कोटी इतक्या रकमेची देणी देण्याची संपूर्ण जबाबदारी स्वीकारुन तसे लेखी हमीपत्र दिले. यास्तव बॅंकेने बोलीदारास सूतगिरणीच्या मालमत्तेची विक्री केली आहे.

महांकाली सहकारी साखर कारखान्याकडील थकबाकी वसुलीकरीता सांगली जि.म.स. बँकेने सेक्युरिटायझेशन ॲक्ट, २००२ अंतर्गत मार्च २०२० मध्ये कारखान्याची संपूर्ण मालमत्ता नॉन बँकींग ॲसेट म्हणून खरेदी केली. मा.कर्जवसुली न्यायाधिकरण, पुणे (डी.आर.टी.) यांच्या दिनांक २९/०८/२०२२ रोजीच्या आदेशाप्रमाणे कारखान्याकडील ८० एकर जमीन विकसित करुन, त्याच्या विक्रीतून बँकेचे कर्ज फेडण्यासाठी दिनांक २८/११/२०२२ रोजी सांगली जि.म.स.बँक, महांकाली सहकारी साखर कारखाना व शिव लॅण्डमार्क प्रापर्टीज प्रा. लि., यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार झाला. त्यानुसार शिल्लक कर्जापोटी OTS अंतर्गत भरावयाचे रुपये १७.५५ कोटी व नॉन बँकींग ॲसेट म्हणून खरेदी केलेली रुपये ८२.६३ कोटी रकमेच्या परतफेडीचे शेड्युल निश्चित करुन देण्यात आले आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ६० एकर जमीन विकसीत केली आहे. सदर कारखाना/ कंपनीकडून एकूण रुपये १५.७० कोटी इतकी रक्कम बँकेचे कर्ज व त्यावरील व्याज अशी भरणा केली आहे.

तथापि, सदर कारखाना / कंपनी मे.डी.आर.टी. कोर्टाने दिनांक १४/०१/२०२४ पर्यंत दिलेल्या मुदतीमध्ये संपूर्ण रक्कम भरणा करण्यास असमर्थ ठरल्याने सांगली जि.म.स.बँकेच्या दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या संचालक मंडळ सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार सदर करार रद्द करुन मे.डी.आर.टी. न्यायालयाचे आदेश घेऊन कारखान्याच्या मालमत्तेची लिलावाने विक्री करण्याचे ठरविले आले.

तसेच सांगली जि.म.स. बॅंकेतील काही कर्मचाऱ्यांनी शासकीय अनुदान, दुष्काळ निधी, पीक विमा, दिलेले व्याज इ. प्रकारच्या खात्यावर गैरव्यवहार करुन अपहार केल्याच्या प्रकरणी जबाबदार १५ अधिकारी/ कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आले आहे. तसेच १३ कर्मचाऱ्यांवर दिनांक ३०/०६/२०२४ रोजी FIR दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आगरदांडा (ता.मुरुड, जि.रायगड) येथील रेल्वे मार्गिकेसाठीच्या भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध असल्याबाबत

**(२६) * २३२६३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा ते अदानी पोर्ट अशा रेल्वे मार्गिकेसाठी भूमी अभिलेख विभाग, मुरूड-जंजिरा यांनी आगरदांडा (ता.मुरुड, जि.रायगड) येथील रेल्वे भूसंपादनाच्या मोजणीसाठी बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना नोटीस बजाविल्या असूनही सदर रेल्वे भूसंपादनाविरोधात शेतकऱ्यांनी आक्रमक होऊन भूसंपादनाच्या मोजणीला विरोध केल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी ७/१२ वर दिलेल्या कच्च्या पेन्सिलचा शेरा रद्द करून सदरच्या रेल्वेमार्गिकांचे काम गावाबाहेरील महामार्गाच्या बाजूने घेऊन जाण्याची मागणी माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने ७/१२ वर दिलेल्या कच्च्या पेन्सिलचा शेरा रद्द करून सदरची रेल्वेमार्गीका बदलण्याबाबत भूमीअभिलेख विभागाकडून सुधारित आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२) व (३) मौजे आगरदांडा (ता.मुरुड, जि.रायगड) येथील शेतकऱ्यांनी, रोहा ते अदानी पोर्ट या रेल्वे मार्गिकेसाठी करण्यात येत असलेल्या भूसंपादनासाठी माहे एप्रिल, २०२४ दरम्यानच्या मोजणीस विरोध करुन, त्याचवेळी सदर रेल्वे मार्गिका गावा बाहेरुन महामार्गाच्या बाजूने घ्यावी व शेतकऱ्यांच्या ७/१२ वरील कच्च्या पेन्सीलीचे आजमितीचे शेरे रद्द करण्याची मागणी केली आहे.

सदर मागणीबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक २७/०५/२०२४ रोजी प्रादेशीक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पनवेल यांना अवगत केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंचन विहिरी खोदकाम योजनांमधील अनुदानाच्या रकमेतील तफावत दूर करण्याबाबत

**(२७) * २३५१७ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंचन विहिरी खोदण्याकरीता जिल्हा परिषद कृषी विभागाकडून अनुसूचित जातीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व सर्वसाधारण लाभार्थ्यांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजना राबविली जात असून या दोन्ही योजनांमध्ये अनुक्रमे अडीच लाख रुपये व चार लाख रुपये इतके अनुदान मिळत असून, या रकमेतील तफावतीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजनेंतर्गत दोन विहिरींतील अंतराची अट नाही, परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास दोन विहिरीत खाजगी विहिरीपासून ५०० फुटांचे तर शासनाच्या विहिरींपासून ५०० मीटरच्या अंतराची अट असल्याने तसेच या दोन योजनांमध्ये असलेली तफावत व किचकट अटींमुळे अहमदनगर जिल्ह्यातील हजारो शेतकरी विहिरीच्या लाभापासून वंचित राहत असून, मागील चार वर्षात अहमदनगर जिल्ह्यात ३६८० लाभार्थ्यांपैकी ३००० लाभार्थी अपात्र ठरले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतून लाभ देताना उपरोक्त अटी शिथील करण्यासाठी कृषी आयुक्तांनी सचिवांना पत्र पाठवून दीड वर्षाचा कालावधी होऊनही त्यात कोणताही बदल झाला नसल्याने लाभार्थ्यांची संख्या कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोन्ही योजनेतून लाभार्थ्यांना मिळणाऱ्या अनुदानात येणारी तफावत दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) सन २०१६-१७ पासून राज्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत सिंचन विहिरीसाठी रुपये २.५० लाख इतके अनुदान दिले जाते. तर नियोजन विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण योजनेंतर्गत नोव्हेंबर, २०२२ पासून सिंचन विहिरीसाठी रुपये चार लाख इतके अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. अनुदानातील या तफावतीमुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत सिंचन विहीर व योजनेंतर्गत इतर बाबींमध्ये व त्यावरील अनुदानाच्या रकमेमध्ये वाढ करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

(२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत दोन सिंचन विहिरींमधील ५०० फूट अंतराची अट रद्द करण्याबाबत शासनस्तवर विचारविनिमय सुरु आहे.

सदर योजनेंतर्गत अहमदनगर जिल्ह्यात मागील चार वर्षात नवीन विहीर या बाबीसाठी एकूण ३७११ अर्ज प्राप्त झाले असून यापैकी ३२७१ अर्ज विविध कारणांमुळे रद्द झाले आहेत, हे खरे आहे.

(३) व (४) अशी बाब नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत घटकांमध्ये वाढ करणे, त्यांचे आर्थिक मापदंड वाढविणे, निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबतच्या सविस्तर प्रस्तावावर शासन मान्यता घेण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंतप्रधान पीक विमा योजनेचा लाभ देण्याबाबत

**(२८) * २३७३२ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे कापूस व इतर शेती पिकांचे नुकसान झाल्याने सुमारे ४ लाख शेतकरी पंतप्रधान पीक विमा योजनेच्या लाभापासून वंचित असल्याची बाब दिनांक ९ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंतप्रधान पीक विमा योजनेचा लाभ सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
प्रधानमंत्री पीक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येत असून सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दिनांक २७/०५/२०२४ च्या अंतरिम आकडेवारीनुसार जळगाव जिल्ह्यातील एकूण २.०८ लाख नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रुपये १२९.५९ कोटी नुकसान भरपाई मंजूर झाली आहे.
(३) खरीप २०२३ अंतर्गत दिनांक २७/०५/२०२४ च्या अंतरिम आकडेवारीनुसार जळगाव जिल्ह्याकरीता रुपये १२९.५९ कोटी पीक विमा नुकसान भरपाई मंजूर झाली असून त्यापैकी रुपये ७७.३७ कोटी पीक विमा नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे. उर्वरीत नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी आश्रमशाळेत होणारी भाजीपाला व तत्सम किरकोळ खरेदी ही स्थानिक स्तरावरुन करणेबाबत

**(२९) * २३७८४ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक आश्रमशाळेत प्रवेशित विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सकस भाजीपाला, फळे, अंडी इत्यादीची खरेदी पूर्वी स्थानिक स्तरावर आदिवासी समाजाच्या बचत गट, संस्था अथवा व्यक्तींकडून केली जात असल्याने स्थानिक आदिवासी समाजाच्या कुटुंबाला रोजगारही मिळत होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:परिस्थितीत उक्त खरेदीकरीता आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचेस्तरावर एकच निविदा अथवा विभागवार निविदा काढल्या जात असल्याने वस्तूंची गुणवत्ता, पुरवठा कालावधी तसेच स्थानिक नागरिकांच्या रोजगारावर परिणाम होत असून ही प्रक्रिया पूर्वी प्रमाणे स्थानिक स्तरावर राबविण्यात यावी अशी मागणी अनेक संघटनांनी शासनाकडे केली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मागण्यांचा अनुषंगाने स्थानिक स्तरावरच खरेदी प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागांतर्गत येत असलेल्या शासकीय आश्रमशाळेतील प्रवेशीत विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारा सकस आहार भाजीपाला, फळे, अंडी इत्यादीची खरेदी करण्यासाठी प्रकल्प यांचे स्तरावर आश्रमशाळा निहाय ई-निविदा प्रक्रिया राबवून न्युनतम दरधारक यांचेमार्फत शाळा स्तरावर भाजीपाला,फळे, अंडी या वस्तुंचा पुरवठा करण्यात येत होता.
(२) व (३) शासकीय आश्रमशाळांना भाजीपाला, मटन, चिकन, दूध, अंडी, केळी व शासकीय वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्याकरीता प्रकल्प स्तरावर शाळानिहाय /वसतिगृहनिहाय निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणावर पुरवठाधारक सहभागी होतात. अशावेळी निकृष्ट साहित्य पुरवठाधारकांवर जबाबदारी निश्चित करणे शक्य होत नाही. दरांमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून येत असल्याने निविदाप्रक्रिया मंजूर करताना एक वाक्यता, सुसुत्रता व एकसमान दर राहण्याकरीता अपर आयुक्त, आदिवासी विकास यांचे स्तरावरून सदर बाबींची एकसमान ई-निविदा प्रक्रिया राबवून शासकीय आश्रमशाळांना अंडी, केळी, मटन-चिकन व भाजीपाला पुरवठा करणेबाबत दिनांक २१/०८/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील मनोरंजनासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचे आरक्षण बदलून खाजगी रुग्णालयास देण्यात येत असल्याबाबत

**(३०) * २४१२८ श्री.अंबादास दानवे, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील खाजगी रुग्णालयाशेजारी मनोरंजनासाठी आरक्षित असलेल्या अडीच एकर भूखंडाचे आरक्षण बदलून खाजगी रुग्णालयास उपलब्ध करुन देण्यासाठी महसूल विभागाकडून प्रयत्न सुरु असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हृदयरोगतज्ञ डॉ.नीतू मांडके यांना अंधेरी (मुंबई) येथे हृदयरोग उपचार व संशोधन केंद्राची निर्मिती तसेच गरीब व गरजू रुग्णांकरीता रुग्णालय बांधण्यासाठी प्रति चौरस मीटर एक रुपया या दराने ३० वर्षासाठी देण्यात आलेल्या शासनाच्या जागेवर सदर रुग्णालय असून डॉ.मांडके यांचे निधन झाल्यानंतर सदर रुग्णालयाचे बांधकाम खाजगी कंपनीमार्फत पूर्ण करुन ट्रस्टचा संपूर्ण कारभार बदली केल्याप्रकरणी तसेच कोकिळाबेन अंबानी रुग्णालय असे नामकरण केल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी रुपये १५० कोटी अनर्जित रक्कम भरण्याचा दिलेला आदेश मंत्रालयाच्या महसूल विभागाच्या सुनावणीमध्ये बदलण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मालती वसंत हार्ट ट्रस्ट वरील डॉक्टर मांडके यांच्या पत्नी डॉक्टर अलका मांडके वगळता अन्य सर्व विश्वस्त बदलण्यात आल्याने या भूखंडाचे हस्तांतरण असल्याचे तसेच शासनाची पूर्वपरवानगी न घेता वाणिज्य वापर होत असल्याबद्दल महालेखापालानी अक्षेप घेतल्यामुळे शासनाने अनर्जित रकमेपोटी ट्रस्ट कडून १७६ कोटी रुपये वसूल करणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मालती वसंत हार्ट ट्रस्टच्या शेजारी असलेला भूखंड मिळण्याबाबतच्या अर्जावर मंत्रालयीन महसूल विभागातील अधिकाऱ्यांकडून भूखंडावरील आरक्षण बदलून रुग्णालयासाठी आरक्षित करता येण्याबाबतचे अभिप्राय मुंबई महानगरपालिकेकडून मागविले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने मनोरंजनासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचे आरक्षण न बदलता यापूर्वी रुग्णालय बांधण्यासाठी ट्रस्टला देण्यात आलेल्या भूखंडावर गरजू व सर्वसामान्य रुग्णांना परवडणाऱ्या वैद्यकीय सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी रुपये १५० कोटी अनर्जित रक्कम भरण्याकरीता रुग्णालय व ट्रस्टवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

मालती वसंत हार्ट ट्रस्ट यांनी दिनांक ०६/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मौजे आंबिवली, ता.अंधेरी येथील स.नं. १४१अ, न.भू.क्र.८३३ येथील मालती वसंत हार्ट ट्रस्ट या संस्थेस भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनी शेजारील सध्या रिक्त असलेला भूखंड क्रमांक १४१/A/११W (न.भू.क्र. ८३३) आरोग्य पायाभूत सुविधांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी मंजूर करण्याबाबत विनंती केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १३/१२/२०२३ रोजी शासनास अहवाल सादर केला आहे. ट्रस्टची मागणी तसेच जिल्हाधिकारी यांचा अहवाल विचारात घेऊन शासन पत्र दिनांक १२/०२/२०२४ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्यामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अभिप्राय मागविले आहेत.

(२) व (३) महालेखापाल, नागपूर यांचे कार्यालयातील लेखा परीक्षा पथकाने सन-२०११ चे भाडेपट्टा प्रकरणांचे लेखा परिक्षण केले असता त्यांनी मालती वसंत हार्ट ट्रस्ट संस्थेला हृदयरोग संशोधन केंद्र व रुग्णालय बांधण्यासाठी भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या रुग्णालयाच्या इमारतीचा काही भागाचा वापर गीफ्ट शॉप, स्पा, ब्युटी सलून, फुड कोर्ट, रिलायन्स कंपनीचे ऑफीस

इत्यादी वाणिज्य प्रयोजनासाठी करण्यात येत आहे. तसेच, सदरचे रुग्णालयाचा काही भाग हे व्यावसायिक संस्थेकडे हस्तांतरीत झाले आहे. त्यांचेकडून शासन अनर्जित उत्पन्नाची रक्कम रुपये १७६.२३ कोटी वसूल करणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी रुपये ५७.८४ कोटी अनर्जित उत्पन्न वसूल करण्याबाबत आदेश पारीत केले होते, हे खरे आहे. तथापि, याप्रकरणी तत्का. मा.मंत्री (महसूल) यांनी दिनांक १६/०५/२०१८ रोजी अर्धन्यायिक आदेश पारीत केले आहेत. सदर अर्धन्यायिक आदेशामध्ये विविध न्यायालयाच्या आदेशांचा संदर्भ देऊन, एखाद्या न्यासाच्या विश्वस्तांमध्ये बदल झाल्यास न्यासाच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार एका विश्वस्तांकडून दुसऱ्या विश्वस्तांकडे हस्तांतरीत होत असतात. तथापि, त्यामुळे न्यासाच्या मालमत्तेचे/मिळकतीचे हस्तांतरण झाले असे समजता येत नाही, असा निष्कर्ष काढलेला आहे. तसेच आदेशात अर्जदार न्यासाच्या विश्वस्तांमध्ये बदल करण्यासाठी अथवा नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असल्याची कोणतीही अट अर्जदार संस्थेस जमीन प्रदान करणाऱ्या आदेशात अथवा जमीन प्रदान केल्यानंतरच्या सनदेमध्ये अंतर्भूत नसल्याने अर्जदार न्यासाच्या विश्वस्तांमध्ये बदल करण्यासाठी/ विश्वस्तांमध्ये वाढ करण्यासाठी शासनाची पूर्व परवानगी आवश्यक असल्याचे दिसून येत नाही, असाही निष्कर्ष काढण्यात आला आहे. ही बाब विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी जमिनीचे हस्तांतरण झालेले नसल्यामुळे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनर्जित उत्पन्न वसूल करता येणार नाही. यास्तव अनर्जित उत्पन्न वसूलीबाबतचे प्रकरण बंद करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना शासन स्तरावरुन देण्यात आले आहेत. तसेच, मालती वसंत हार्ट ट्रस्ट यांना भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनीवरील इमारतीमध्ये काही भागाचा वाणिज्यिक वापर केल्यामुळे संबंधितांकडून शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना शासन स्तरावरुन देण्यात आले आहेत.

(४) व (५) अर्जदार यांनी मागणी केलेल्या क्षेत्रावरील मनोरंजन मैदानाचे (RG/Recreation Ground) आरक्षण वगळून सदर क्षेत्र रुग्णालयासाठी आरक्षित करता येईल किंवा कसे, याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अभिप्राय मागविले आहेत. तथापि, सदर अभिप्राय अद्याप शासनास प्राप्त झालेले नाहीत. सदर अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी शासन स्तरावर योग्य तो निर्णय गुणवत्तेवर घेण्यात येईल. तसेच मालती वसंत हार्ट ट्रस्ट यांना शासनाने प्रदान केलेल्या जमिनीचे हस्तांतरण होत नसल्यामुळे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अनर्जित उत्पन्न लागू होत नाही. त्यामुळे अनर्जित उत्पन्न वसूल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: पश्चिम विदर्भातील अकोला व बुलढाणा जिल्ह्याचे तुषार व ठिबक सिंचनाचे कोट्यवधीं रुपयांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(३१) * २३४९४ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील सुमारे ५० कोटी रुपयांहून अधिक तर अकोला जिल्ह्यातही कोट्यवधी रुपयांचे तुषार व ठिबक सिंचनाचे अनुदान अद्याप शेतकऱ्यांना न मिळाल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम विदर्भातील अकोला व बुलढाणा या जिल्ह्यांसह राज्यातील इतर सर्वच जिल्ह्यांमधील तुषार व ठिबक सिंचनाचे कोट्यवधी रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांना लवकरात लवकर मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१), (२) व (३) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजना-प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) योजनेंतर्गत ठिबक व तुषार सिंचनाकरीता अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना ५५% तर इतर शेतकऱ्यांना (५ हेक्टरच्या मर्यादेत) ४५% अनुदान देण्यात येते. या व्यतिरिक्त सूक्ष्म सिंचन घटकासाठी मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेमधून व अटल भूजल योजनेत समाविष्ट १४४० गावांमधील शेतकऱ्यांना अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना २५% तर इतर शेतकऱ्यांना (५ हेक्टरच्या मर्यादेत) ३०% पुरक अनुदान देण्यात येते.

सन २०२३-२४ मध्ये सूक्ष्म सिंचन घटकासाठी उपरोक्त योजनांमधून रुपये ४०६.१७ कोटी (राकृवियो-प्रति थेंब अधिक पीक रुपये १५४.१७ कोटी + मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना रुपये २५०.०० कोटी + अटल भूजल योजना रुपये २.०० कोटी) निधी प्राप्त झाला होता.सदर निधीतून अकोला जिल्ह्याला रुपये ३.४१ कोटी व बुलढाणा जिल्ह्यात रुपये १५.३१ कोटी निधी वितरीत करण्यात आला असून अकोला व बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे अनुक्रमे रुपये ७.१० कोटी व रुपये ६४.०८ कोटीचे अनुदान वितरण बाकी आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) योजनेकरीता सन २०२४-२५ साठी निधी मागणीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे. सदर निधी प्राप्त होताच लाभार्थ्यांना अनुदान वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे व कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्या करित असल्याबाबत

**(३२) * २३२४० श्री.जयंत पाटील, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तापमानाचा आणि बाष्पीभवनाचा वेग वाढत असल्यामुळे उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि दक्षिण व पश्चिम महाराष्ट्रातील कमाल तापमान ४० डिग्री सेल्सिअसहूनही अधिक प्रमाणात वाढले असल्याने धरणांमधील व नद्यांमधील पाण्याचे प्रमाण कमी होऊन तलाव कोरडे पडत असल्याबाबतची माहिती कृषी हवामान तज्ज्ञांकडून माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास व्यक्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊन विदर्भ, मराठवाड्यात पाण्याअभावी ४२ लाख हेक्टर जागेवरील कापसाच्या पिकांचे आणि २२ लाख हेक्टर जागेवरील सोयाबीनच्या पिकांचे व मराठवाड्यात मोसंबी व अनेक फळबागांचेही तसेच अनेक ठिकाणी रब्बी पिकांचे प्रचंड नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांनी हताश होऊन फळझाडे उपटून टाकल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिवृष्टी, पूर, अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि गारपीटीमुळेही पिकांच्या होत असलेल्या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल होऊन कर्जबाजारीपणाला कंटाळून मराठवाड्यातील अमरावती विभागासह, नागपूर नाशिक व पुणे विभागात ४२७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

कृषी हवामान तज्ज्ञांकडून कोणताही अहवाल प्राप्त नाही.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) राज्यात माहे मे, २०२३ अखेर विविध कारणांमुळे शेतकरी आत्महत्यांची १०४६ प्रकरणांपैकी शासन निर्णयातील तरतूदी नुसार ३५८ पात्र शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देण्यात आली आहे. तसेच, दिनांक २९ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये खरीप हंगाम २०२३ मधील दुष्काळामुळे झालेल्या शेतीपिकाच्या नुकसानीकरीता बाधित शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान देण्यासाठी निधी वितरीत करण्यास मान्यता दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने शेतकऱ्यांना कृषी अवजारे पुरविणाऱ्या कंपन्यांची देयके प्रलंबित ठेवल्याबाबत

**(३३) * २३५०७ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने शेतकऱ्यांना कृषी अवजारे पुरविणाऱ्या कंपन्यांची देयके थकविल्याने सुक्ष्म लघु उपक्रम सुविधा परिषदेने या महामंडळाला १४ कोटी ९१ लाख रुपये भरण्याचे आदेश दिल्याचे माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी अवजारे पुरविणाऱ्या कंत्राटदार कंपनीची देयके जाणीव पूर्वक प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कृषी उद्योग विकास महामंडळाचे कामकाज सक्षमपणे चालविण्याकरीता शेतकऱ्यांच्या कृषी अवजाराची देयके यापुढे विहित कालावधीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे. सुक्ष्म लघु उपक्रम सुविधा परिषदेने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाला रुपये १४ कोटी ८० लाख इतकी रक्कम भरण्याचे आदेश दिनांक ३१/०१/२०२४ च्या लवाद निवाडानुसार दिले आहेत.

(२) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या कृषी अवजारे पुरवठादाराने अप्राप्त रकमेच्या वसुली करीता महामंडळाच्या विरुध्द सुक्ष्म लघु उपक्रम सुविधा परिषदेकडे दाद मागितली होती. त्यानुषंगाने, परिषदेने थकित देय रक्कम व्याजासह एकूण रुपये १४८० लाख पुरवठादारास देणेबाबत आदेशित केले आहे. सदर आदेशाविरुध्द महामंडळाने जिल्हा सत्र न्यायालय, नागपूर येथे अपील क्र.C.C.D. No. ४५/२०२४ दाखल केले असून, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच, सद्य:स्थितीत शासनाच्या थेट लाभ हस्तांतरण धोरणानुसार (DBT) कृषी औजारांसाठी देय अनुदानाची रक्कम शेतकऱ्याच्या खात्यावर जमा केली जात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**मुंबई.** **सचिव (१)(कार्यभार),**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.